REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ, ' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी रु. ४

( टपाल हंशील माफ )

किरकोळ अंकास दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २६ एप्रिल, १९४४ अंक १७

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

मुख्य कचेरी : प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, बुधवार, पुणें.

अधिकृत भांडवल रु. १०,००,००० : विक्रीस काढलेलें रु. ५,००,०००

खपलेलें भांडवल रु. ३,९५,१०० : जमा भांडवल रु. १,३२,९०५

खेळतें भांडवल रु. २२ लक्षांच्या वर

### मुंबई शाखा अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर उघडण्यांत आली.

जागा : इस्माइल बिल्डिंग. ३८१ हॉर्नबी रोड, मुंबई.

संचालक मंडळाचे अध्यक्ष : श्री. ग. रा. साठे

गोपाळ धोंडोपंत ओगलेकर, बी. ए. ( ऑनर्स ) बी. कॉम., एलएल. बी., मुख्य कचेरीचे मॅनेजर.

श्री. चिं. त्रिं. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई शाखेचे सल्लागार मंडळ

श्री. गोविंदराव आनंदराव कुलकर्णी, मालक, कन्सॉलिडेटेड मिल सप्लाईज, मुंबई ( अध्यक्ष )

श्री. विष्णु गोविंद गांगल, भागीदार, काळे सेल्स असोसिएशन, मुंबई, सभासद

शेठ भगवानदास हिरालाल मंडेरिया, भागीदार, डायमंड इलेक्ट्रिक कंपनी, मुंबई, सभासद

श्री. मोरेश्वर मार्तंड मड्डे, बी. ई. (बनारस) भागीदार, युनिव्हर्सल सप्लाय अँड ट्रेडिंग कंपनी, मुंबई, सभासद

श्री. लक्ष्मण महादेव जोशी, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. मुंबई

श्री. गोविंद हनमंत ओक, बी. ए.
मुंबई शाखा एजंट

## ★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

विनाथ, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मॅंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅब्लिट्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

★

शाखाः—
माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेच्या मुंबई शाखेचें उद्घाटन

अध्यक्ष, श्री. जी. आर. साठे, ह्यांचें भाषण

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. च्या मुंबई शाखेचें उद्घाटन २५ एप्रिल रोजीं झालें. त्याप्रसंगीं बँकेचे चेअरमन; बिस्किट व कोको फॅक्टरीचे मालक श्री. जी. आर. साठे, ह्यांनीं बँकेच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला. औद्योगिक संस्थांस भांडवल पुरविण्यासाठी आजवर करण्यांत आलेल्या प्रयत्नांची त्यांनीं माहिती दिली. त्याचप्रमाणें, बँकेस ज्या व्यक्तींचे व संस्थांचें सहाय झालें, त्यांचा नामनिर्देश करून आभार मानले. नंतर ते म्हणाले, "बँकेनें ज्यांस सहाय करून भरभराटीस आणलें, अशा सर्वांचा उल्लेख करतां येणें शक्य नसलें, तरी डेक्कन पेपर मिलबाबत कॅनरा पेपर अँण्ड पल्प कं. लि. चा व्यवहार, पेसा फंडाची उर्जितावस्था, कॉमनवेल्थ कंपनीचा पुनर्जन्म, इत्यादि संबंधांतील प्रेसिडेन्सी बँकेची कामगिरी जनतेस पूर्ण परिचयाची आहे. गिऱ्हाइकांना सवलती देत असतांनाच बँकेची परिस्थिति भक्कम होत गेलेली आहे व बँकेची स्वतःची इमारत असणाऱ्या अत्यंत थोड्या बँकांच्या पंक्तीस ती येऊन बसली आहे. मुंबईमध्यें शाखा उघडून बँक आपल्या व्यवहारांचा विस्तार करीत आहे व आपल्या अंतिम विस्तृत ध्येयसिद्धीच्या नजीक जात आहे."

### बँकेची प्रगति

| वर्ष | वसूल भांडवल | खेळतें भांडवल | डिव्हिडंड (करमाफ) |
|---|---|---|---|
| १९३८ | ३८,३८० | ३,०३,००० | २½ |
| १९३९ | ४८,९१५ | १३,९७,००० | २½ |
| १९४० | ५८,०८० | ४,३७,०६० | २½ |
| १९४१ | ६८,४३० | ६,०३,००० | २½ |
| १९४२ | ७३,६८० | ११,०४,००० | ३% |
| १९४३ | १,०१,२९५ | १९,९१,७०० | ४% |
| १९४४ | १,३२,९०५ | २२,००,००० | |

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक
न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.
( हेड ऑफिस : मुंबई )
अधिकृत भांडवल : २०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.
एकूण खेळतें भांडवल : ९७,००,००० रु.
—: शाखा :—
सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.
D. N. Gandekar, B.A., LL.B. पुणें ब्रँच मॅनेजर
D. D. Deshpande. B.A. मॅनेजिंग डायरेक्टर

## विविध माहिती

### गोकाक मिल्स लि.

वरील कंपनीला १९४३ सालीं ६५ लक्ष, ६७ हजार रुपये नफा झाला व भागीदारांस करमाफ २२% डिव्हिडंड मिळालें. या कंपनीच्या दोन्ही गिरण्या गोकाक येथें असून त्यांत ७४,३२८ चात्या आहेत. मेसर्स फोर्बस फोर्बस कॅंबेल अँड कंपनी लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

### एम्पायर ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४३ सालीं २ कोटि, ९२ लक्ष रुपयांचें काम मिळविलें. कंपनीनें १९४३ अखेर आपले हप्त्यांचे दर वाढविले आहेत.

### भाजीसाठीं अमेरिकन बीं

अमेरिकेंतून इंग्लंडमध्यें भाजीच्या बियांचीं ८० हजार पाकिटें येऊन दाखल झालीं आहेत, त्यांपासून ५० हजार टन भाजी निघूं शकेल. प्रत्येक पाकिटांत वेगवेगळ्या बियांच्या १८ पुड्या आहेत, त्यापासून येणारी भाजी पांचाच्या कुटुंबास वर्षभर पुरेल.

### अमेरिकेची ग्रेट-ब्रिटनमधील गुंतवणूक

ग्रेट-ब्रिटनमधील अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीचा आकडा आतां ३ अब्ज, ३५ कोटि रुपये झाला आहे.

### जरीला कपाशीचा प्रसार

नवापूर पेटा व तळोदें तालुका वगळून बाकी सर्व प. खान-देश जिल्हा व नाशिक जिल्ह्यांतील मालेगांव बागलाण, नांदगाव, कळवण आणि येवला हे तालुके ह्यांत जरीला कपाशीखेरीज दुसरी कोणतीहि कपास पेरण्यास व जरिलामध्यें दुसऱ्या कपाशीची भेसळ करण्यास बंदी करण्याचा मुंबई सरकारचा मानस आहे. त्याचप्रमाणें, इतर कोणत्याहि जातीची कपास बाळगणें, वापरणें अथवा खरेदीविक्री करणें ह्यास मनाई करण्याचा किंवा त्यांवर निर्बंध घालण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या संबंधांत कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या त्यांनीं २९ जून पूर्वी सरकारकडे पाठवाव्यात.

### बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरांची निवडणूक

बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर, लॉर्ड कॅटो व डेप्युटी गव्हर्नर मि. बेसिल कॅटर्नस, ह्यांची निवडणूक ता. १८ रोजीं झाली. निवडणूक बिनविरोध होती, तरी वहिवाटीप्रमाणें त्याच्या समारंभास पांच तास लागले.

### इस्पितळांतील मृत्यु

कलकत्ता शहर व इतर ठिकाणचीं इस्पितळें ह्यांत ३१ मार्च अखेरच्या साडेपांच महिन्यांत १४,१०५ निराश्रित मरण पावले असें अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालें आहे.

### तिरुपति देवस्थानाच्या पैशाचा विनियोग

तिरुपति देवस्थानाच्या उत्पन्नाचा कांहीं अंश एक चांगल्या दर्जाचें कॉलेज चालविण्याकडे करण्याचा मद्रास सरकारचा उद्देश आहे. ह्या कॉलेजांत हिंदूंप्रमाणें इतर धर्मांच्या विद्यार्थ्यांसहि प्रवेश मिळावयाचा आहे. ह्यासंबंधांतील कायद्याचा मसुदा लोकमत अजमावण्यासाठी सरकारनें प्रसिद्ध केला आहे, त्यास विरोध होत असल्याचें दिसतें.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ११० |
| २ अन्नपुरवठा आणि सहकारी कार्य ... | १३१ |
| ३ शेअर बाजार ... | १३२ |
| ४ द. आफ्रिकेंतील सोन्याची हिंदुस्थानांत विक्री ... | १३२ |
| ५ स्फुट विचार ... | १३३ |
| सहकार संवर्धनाची युद्धोत्तर योजना–श्री. मसानी यांचे विचार–होळकर संस्थानांतील सहकारी प्रगति–नौबे को. कायदी ... | |
| ६ मिरजोळे शे. स. पतपेढी | १३४ |
| ७ धान्य वाटपासाठीं सहकारी संघटना ... | १३५ |
| ८ हातमाग टिकवले व वाढवले पाहिजेत ... | १३६ |



# अर्थ

बुधवार, ता. २६ एप्रिल, १९४४


## अन्नपुरवठा आणि सहकारी कार्य

नवीन शेतीचा हंगाम जसजसा जवळ येत चालला आहे तसतसे धान्याचें उत्पादन आणि त्याची वाटणी यांचे संबंधांतले प्रश्न अधिक महत्त्वाचे होत आहेत. मुंबई प्रांताच्या दृष्टीनें विचार करतां वाढत्या स्थानिक उत्पादनाचें अगत्य विशेष आहे हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. मागें या प्रांतास धान्याचा तुटवडा कधींच भासला नाहीं, मग तो आताच कां भासावा असें कित्येक जण विचारतात. त्यांस हेंच उत्तर आहे कीं, मामुली परिस्थितींत या प्रांतांत बाहेरून धान्य येत असें तसें तें युद्धकाळांत येऊं शकत नाहीं. ब्रह्मदेशांतून यावयाचा तांदूळ बंद झाल्यामुळें या धान्याचा तुटवडा सर्व देशभर भासत आहे आणि त्या राष्ट्रीय पुरवठ्याची प्रांतानिहाय वाटणी होईल तींत मिळणाऱ्या हिश्शावर प्रत्येक प्रांतास आपला गुजारा करणें प्राप्त आहे. वाहतुकीच्या अडचणी आणि इतर प्रांतांतील पिकांची बरी वाईट स्थिति यांनीं धान्याची या प्रांतांत होणारी आयात मर्यादित केली जावें स्वाभाविक आहे. सुबत्तेच्या प्रांतांतून तुटीच्या प्रांतांस धान्याचा शक्य तेवढा पुरवठा करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरवलें आहे तरी असल्या सहाय्यावर स्वतःची तूट भरून काढण्यासाठी मुंबईनें अवलंबून रहाणें इष्ट नाहीं आणि या प्रांतानें आपल्यापुरतें उत्पादन शक्य तितक्या प्रमाणांत वाढवणें आवश्यक आहे. उत्पादन वाढवण्याचे प्रांतिक सरकारनें प्रयत्न चालवले आहेत त्यांस जमीनदार वर्गानें सहाय देणें अगत्याचें आहे. दुष्काळांत तेरावा महिना या न्यायानें मुंबईंत परवां स्फोट होऊन इतर मालमत्तेबरोबर धान्याचा मोठा साठा नष्ट झाला. अशा पावसाच्या वगैरे दैवी आपत्ति उत्पादन व पुरवठा यांच्या अंदाजांत हिशेबांत घेणें आवश्यक असल्यानें या प्रांतानें धान्याच्या पिकाचें क्षेत्र सरकारच्या बेतानें सुचवलें गेल्याप्रमाणें शक्य तितकें वाढवणें किती आवश्यक आहे हें दिसून येणार आहे.

युद्धोत्तर काळांत आर्थिक संवर्धनाच्या कोणत्या योजना हातीं घ्याव्या याची चर्चा सध्यां सर्वत्र चालली आहे. पण प्रत्यक्ष युद्ध परिस्थितींत असल्या योजनांचें आणि त्यांत मूलभूत असलेल्या सरकारी नियंत्रणाचें अगत्य अधिक आहे हें विसरून चालणार नाहीं. धान्याचा प्रश्न हा जनतेच्या जीविताचा विषय आहे आणि यासाठी कपास, तंबाखूसारखीं पिकें मर्यादित करून त्यांचे जागीं जोंधळा, बाजरी, गहूं इत्यादि पिकें काढणें आवश्यक आहे. मामुली काळांत कोणतीं पिकें करावीं हें प्रत्येक जमीनदार स्वतःच्या इच्छेप्रमाणें ठरवतो, पण राष्ट्रीय अडचणींचे प्रसंगीं जमीनदाराचें हें स्वातंत्र्य मर्यादित करणें अपरिहार्य असतें. या बाबतींत सक्तीचें धोरण अवलंबण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे तें यासाठीच होय. धान्य वाटणींत उत्पादकांनीं स्वतःच्या गरजेपुरतें धान्य ठेवून बाकीचें सरकारास विकलें पाहिजे असा नियम करण्याचा उद्देश स्पष्ट आहे. अशा सक्तीच्या व नियंत्रणाच्या योजनेंत ठराविक किंमतीनें सर्वांस योग्य प्रमाणांत धान्य मिळत जाईल अशी समाधानकारक व्यवस्था करण्याची जबाबदारी सरकारवर पडते आणि ती त्यानें स्वीकारली आहे. याबरोबरच जनतेस भासणाऱ्या अडचणी समजून घेण्याची आणि त्या शक्य तितक्या दूर करण्याची आपली तयारी असल्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे. शहरांत व खेडेगावांत पुरवठा, साठा, खरेदी, विक्री यांविषयींची योजना व्यापक व गुंतागुंतीची होणार आहे. यासाठी सरकार आणि जनता यांचें पूर्ण सहकार्य घडून येणें अगत्याचें आहे. कोणत्याहि योजनेचा चांगुलपणा तिच्या यशस्वी अंमलबजावणीवर अवलंबून रहातो हें सरकारनें ध्यानांत बाळगलें पाहिजे. धान्याच्या पिकांचा विस्तार आणि धान्याची वाटणी यांचे बाबतींत सहकारी संस्थांस सरकारी योजनेंत महत्त्वाचा भाग घेतां येण्यासारखा आहे. पिकें वाढवण्यासाठी शेतकऱ्यांस बीं, हत्यारें, खत वगैरे लागेल तें सहकारी संस्थांच्या मार्फत सरकारनें पुरवावें. या संस्थांनीं याप्रकारचें कार्य अनेक ठिकाणीं यशस्वी रीतीनें केलें आहे. त्याचा विस्तार केला जावा.

या प्रांतांत कित्येक लक्ष एकरांच्या जादा क्षेत्रांत पिकें लावण्यांत येणार आहेत आणि कोकणपट्टीच्या खाऱ्या जमिनींतहि भाताचें पीक काढण्याचा प्रयत्न होईल. याकरितां लागणारें भांडवल सहकारी संस्थांस पुरवतां येईल. धान्याच्या विक्रीचें काम कांहीं शहरांत सहकारी स्टोअर्सच्या मार्फत आज यशस्वी रीतीनें चाललें आहे आणि या पद्धतीचा विस्तार होणें आवश्यक आहे. विशेषतः खेडेगांवांत उत्पादक वर्गास व बिनशेतकरी लोकांस धान्याचा पुरवठा होण्याची जरूरी अलीकडील अनुभवावरून तीव्रतेनें भासत आहे. विशिष्ट मर्यादेपलीकडील धान्य सरकार स्वतः शेतकऱ्यांकडून विकत घेऊन त्याचा साठा करणार आहे आणि त्याच्या विक्रीची तजवीज खेडेगांवांत करणार आहे. ही व्यवस्था शक्य तेथें सहकारी सोसायट्यांकडे सोंपवण्याचें सरकारनें ठरवलें आहे आणि या संधीचा फायदा सहकारी संस्थांनीं पूर्णपणानें करून घेतला पाहिजे. तदर्थ कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडली जावी यासाठी सहकारी संस्थांस लागणाऱ्या सवलती सरकारकडून मिळणें अगत्याचें आहे. धान्य सक्तीनें जमवणें, त्याचा साठा करणें आणि त्याची ठराविक किंमतीनें शहरांत व खेडेगांवांत वाटणी करणें याविषयींची मुंबई सरकारनें हातीं घेतलेली योजना प्रचंड आहे आणि तिच्या योगानें शिधापद्धतीचा अंमल सर्व प्रांतभर होणार आहे. त्या संबंधांत अनेक दोष व अडचणी टीकाकारांनीं पुढें मांडल्या आहेत, त्यांचा विचार काळजीपूर्वक केला जाईल अशी आशा आहे. सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रांत जनतेच्या आर्थिक गरजा सांघिक पद्धतीनें भागवण्याचा अनुभव आहे; हें कार्य मोठ्या विस्तृत क्षेत्रांत आतां केलें जावयाचें आहे आणि त्याची जबाबदारी सहकारी संस्थांनीं उचलणें अगत्याचें आहे.

## शेअर बाजार

( प्रो. श्री. व. त्रि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम. )

मुंबईतील स्फोटामुळें विमा कंपन्यांच्या शेअर्सना तितकाच मोठा धक्का बसला आहे. स्फोटामुळें झालेलें नुकसान शेकडों कोटींवर पोंचलें जात आहे. इतकें नुकसान विमा कंपन्यांना कालत्रयी देतां येईल कीं नाहीं अशी शंका प्रदर्शित केली जात आहे. कारण आगीचें काम करणाऱ्या देशी विमा कंपन्यांचे संचय दहा पांच कोटींवर नाहींत. परदेशी कंपन्यांची गोष्ट थोडीशी वेगळी आहे. जर विमा कंपन्यांनीं नुकसानी दिली नाहीं तर ज्या व्यापारी मंडळींनीं गोदांतील मालाच्या तारणावर बँकांकडून कर्जें काढलीं होतीं त्यांना बँकांच्या रकमा फेडणें दुर्घट होऊन बँकांना फार मोठाल्या रकमांवर तुळशीपत्र ठेवावें लागेल, या भीतीमुळें बँकांचेही शेअर बरेच उतरूं लागले आहेत.

तेव्हां, या स्फोटामुळें नुकसानीची जबाबदारी कायद्यानें कोणावर येते व कोण ती भरून देणार आहे हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न उभा राहतो. प्रथमतः आगीचा विमा उतरवितांना त्यांतून स्फोटामुळें झालेलें नुकसान वगळलें जात असतें. तेव्हां या विमापत्रकांतील अपवादाचा विमा कंपन्या फायदा जरूर घेऊं पाहतील. जेव्हां एकादा स्फोट प्रथम होऊन मग आग लागते व नुकसान होतें तेथें विमा कंपन्यांची भूमिका बरोबर ठरते. पण समजा प्रथम लहानशी आग लागून ती चालूं असता ती पसरून ज्वालाग्राही पदार्थांपर्यंत पोहोंचून मग स्फोट झाला व नुकसानी झाली तर त्या ठिकाणीं नुकसानीचें तात्कालिक कारण जरी स्फोट असलें तरी मूळ कारण आगच ठरते, अशा प्रसंगीं विमा कंपनीला नुकसानी भरून द्यावी लागते. परवांच्या स्फोटाबाबत आतां असें जाहीर झालेलें आहे कीं प्रथम सकाळीं ११ च्या सुमारास एका गोदामास आग लागून ती पसरल्यामुळें स्फोट झाला. तेव्हां वर सांगितलेल्या युक्तिवादाच्या आधारें जबाबदारी विमा कंपन्यांच्या अंगावर बसूं पाहते.

जर विमा कंपन्यांना भरपाई द्यावी लागणार असेल तर ती सरकारच्या मदतीशिवाय देता येणें शक्य नाहीं. हल्लीं सर्व मालाचा युद्ध–विमा उतरविला जात असतो व नुकसानभरपाई सरकारकडून मिळणेची असते. प्रस्तुत नुकसानी युद्ध–विमा या कक्षेंत बसूं शकते किंवा नाहीं हा पुढील प्रश्न उभा राहतो व जर तसा तो बसत असेल तरच सरकार नुकसानी भरून देऊं शकेल. या बाबतींत युद्ध–विम्यासंबंधींचे नियम पाहणें उद्बोधक ठरेल. अर्थात् या नुकसानीचा निर्णय न्यायमंदिरांतच लावून घेणें इष्ट होईल यांत शंका नाहीं. मात्र याची नैतिक जबाबदारी सरकारवर पडते हें जो दारूगोळा पेटला तो साम्राज्यरक्षणासाठींच होता हें लक्षांत घेतल असतां दिसून येईल.

न्यू इंडिया विमा ८९ वरून ६५ व नंतर ७४-८, वल्कन २० वरून १२, ज्युपिटर ३९ वरून २९ इतके विमा शेअर खाली पडले आहेत व इंडिया बँक १८१ वरून १७१, सेंट्रल ७७ वरून ७० व नंतर ७३, युनियन १०-११ वरून ८-१२ इतके बँकांचे शेअर्स वाकले आहेत.

## द. आफ्रिकेंतील सोन्याची हिंदुस्थानांत विक्री

दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या हिंदुस्थानांतील विक्रीसंबंधीं खुलासा त्या देशाच्या फडनविसांनीं नुकताच केला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या असेंब्लींत ह्या प्रश्नावर बरीच चर्चा झाली. इंग्लंड १६८ शिलिंगांस एक औंस ह्या दरानें दक्षिण आफ्रिकेचें सोनें विकत घेऊन हिंदुस्थानांत त्याचे ३२० शिलिंग करते, ह्या गोष्टीचा त्यांत उल्लेख करण्यांत आला. आम्हांला हिंदुस्थानांत सोनें विकावयाचें आहे, असें ब्रिटिश सरकारनें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारास कांहीं महिन्यापूर्वी कळविलें. हिंदुस्थानांत, चलनविस्तार भारी झाला व त्यामुळें येथील ब्रिटिशांची खरेदी महागाईची होऊं लागली तरी पौंड-रुपया हुंडणावळींत हिंदुस्थान सरकारनें बदल केला नाहीं. हिंदुस्थानांतील बाजारभावानें तेथें सोनें विकलें, तर ब्रिटिशांस प्रतिकूल वाटणाऱ्या हुंडणावळीचा परिणाम थोडा फार टळेल व हिंदी चलनविस्तारासहि आळा बसेल, असा ब्रिटिश सरकारनें विचार केला. दक्षिण आफ्रिकाहि कांहीं मालाची खरेदी हिंदुस्थानांत करते व त्या प्रमाणांत हिंदी चलनविस्ताराचा दुष्परिणाम द. आफ्रिकेसहि भोगावा लागतो. तेव्हां, हिंदुस्थानांत सोन्याची किंमत वाढली आहे तिचा योग्य फायदा द. आफ्रिकेसहि मिळावा, अशी तेथील सरकारनें मागणी केली. तेव्हां द. आफ्रिकेच्या आयातीच्या प्रमाणांत तेथील सरकारास सुवर्णविक्रीच्या नफ्यांत वाटा देण्याचें ब्रि. सरकारनें मान्य केलें. द. आफ्रिकेनें आपल्या सोन्याचें सर्वच उत्पादन हिंदुस्थानांत विकण्याचें ठरविलें, तर द. आफ्रिकेचें हिंदुस्थानाकडून येणें तुंबेल व त्याचा त्या देशास उपयोग नाहीं. तसेंच, सोनें पाठविण्यास आगबोटी कोण देणार, त्याच्या विम्याची जोखीम कोण पत्करणार, इत्यादि मुद्देहि महत्त्वाचे आहेत. सोन्याच्या किंमतींत सट्टेबाजी व चढउतार होणें द. आफ्रिकेच्या हिताचें नाहीं; किंमत स्थिर रहाणेंच त्या देशाच्या फायद्याचें आहे. बँक ऑफ इंग्लंडशीं व्यवस्था करून दक्षिण आफ्रिकेनें सोन्याच्या व्यवहारांत सुमारें १५ कोटि रुपयांचा नफा मिळविला आहे. द. आफ्रिकेच्या स्वतःच्या व्यापारासाठीं लागणारें सोनें वगळून बाकी सर्व सोनें त्यानें बँक ऑफ इंग्लंडच्या स्वाधीन करावें व बँक ऑफ इंग्लंडनें लंडन येथील चालू बाजारभावानें सोन्याची किंमत द्यावी असें ठरलें. अशा रीतीनें, बँक ऑफ इंग्लंड द. आफ्रिकेचें सोनें विकत घेऊन हिंदुस्थानांत नफा मिळवीत असली, तरी ह्या व्यवहारांत द. आफ्रिकेचें नुकसान नाहीं. ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानांत सध्याच्या फुगलेल्या दरानें मालाची किंमत देत आहे, तेव्हां येथीलच चालू दरानें सोनें विकून ती दिली जाणें क्रमप्राप्तच आहे, असा ह्यासंबंधींतील युक्तिवाद आहे.

### पशुवैद्यकास उत्तेजन

मुंबई येथील पशुवैद्यकाच्या कॉलेजांत येत्या तीन वर्षांत नांवें दाखल करणाऱ्या उमेदवारांना मुंबई सरकार कांहीं विशेष सवलती देणार आहे. त्यांत कॉलेजच्या व परीक्षेच्या फीची माफी व ६० शिष्यवृत्त्या ह्यांचा समावेश होतो.

# स्फुट विचार

### सहकार संवर्धनाची युद्धोत्तर योजना

राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचें संवर्धन युद्धोत्तर काळांत कसें केलें जावें ह्याची चर्चा अधिकारी व बिगर अधिकारी गोटांत चालली आहे. सहकारी चळवळीच्या प्रगतीचे पुनर्घटनेचे बाबतींत अशीच चर्चा होण्याची आवश्यकता आम्हीं प्रतिपादली असून प्रांतिक इन्स्टिट्यूटनें हा प्रश्न हातीं घेतला असल्याचें लिहिलें होतें. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, प्रांतिक बँकेचे अध्यक्ष व रजिस्ट्रार ह्यांच्या समितीकडे हें काम सरकारनें सोंपवलें आहे आणि तिनें आपला पहिला रिपोर्ट सरकारला सादर केला आहे ही माहिती सर जनार्दनराव मदन ह्यांनीं मुंबई शहरांतील सहकारी संस्थांची परिषद नुकतीच भरली होती, तिचें उद्घाटन करतांना दिली. आपल्या समितीच्या सूचना काय आहेत ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं केलें नाहीं. मुंबई सरकार ह्या प्रांताच्या युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना आखीत आहे तिच्यामध्यें सहकारी संवर्धनाचा अंतर्भाव करतां यावा ह्या हेतूनें वरील पहिला रिपोर्ट समितीनें सादर केला आहे आणि त्यांत खेडेगावांतील सहकारी संस्थांचा विचार करण्यांत आला असल्याचें सर जनार्दन ह्यांनीं सांगितलें आहे. सहकारी चळवळ मुख्यत्वेंकरून ग्रामीण स्वरूपाची असल्या कारणानें तिला अग्रस्थान दिलें जावें हें स्वाभाविक आहे. शहरांचे संबंधांत औद्योगिक सोसायट्या, मजुरांनीं कंत्राटें घेणारांच्या संस्था व दूध पुरवणाऱ्या सोसायट्या ह्यांचेविषयीं पुनर्घटना समितीनें सूचना केल्या आहेत असें सर जनार्दन म्हणाले. ह्या शिफारशी काय आहेत ह्याची कल्पना सहकारी कार्यकर्त्यांस येण्यासाठीं त्यांस लवकर प्रसिद्धि दिली जाणें आवश्यक आहे. पुनर्रचना ह्या नांवास शोभण्यासारखी व्यापक व धडाडीची योजना तयार केली जावी अशी आमची अपेक्षा आहे. पुरेसें द्रव्यसामर्थ्य, मनुष्यबळ व कार्यविस्तार ह्यांचा मिलाफ पुनर्घटनेच्या योजनेंत झाला पाहिजे आणि तो केवळ डागडुगीच्या स्वरूपाचा असतां कामा नये.

---

### श्री. मसानी ह्यांचे सहकाराविषयीं विचार

गेल्या महिन्यांत मुंबई शहरांत भरलेल्या सहकारी परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. एम. आर. मसानी ह्यांनीं केलेलें भाषण उद्बोधक असें झालें. अनेक व्यक्तिनिष्ठ भांडवलवाले एका बाजूस आणि सबगोलंकारी हुकूमशहा दुसऱ्या बाजूस ह्यांचा मध्यबिंदु सहकारी संघटनेनें साधला असल्यानें ती श्रेष्ठ स्वरूपाची आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला तो सर्वथा मननीय आहे. देशाची आर्थिक व्यवस्था योजनात्मक पद्धतीनें व्हावयाची असताहि लोकसत्ता व वैयक्तिक स्वातंत्र्य ह्यांचें संरक्षण करण्याची क्षमता शेती व कारखाने ह्यांतील उत्पादन सहकारी तत्त्वाच्या पायावर उभारलेल्या घटनेंतच आहे ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट रीतीनें पुढें मांडली. कारखानदारी व जमीनदारी ह्यांच्या मानानें सहकारी चळवळ हिंदुस्थानांत उपेक्षणीय ठरली आहे ह्याचें कारण तिला चळवळ हें नांवच शोभत नाहीं आणि ती सरकारच्या धोरणाचें एक अंग आहे इतकेंच, ह्या शब्दांत श्री. मसानी ह्यांनीं तिचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. युद्धपरिस्थितीमध्येंहि हिंदी सहकारी चळवळ जुन्या चाकोरींतून बाहेर पडलेली नाहीं. कर्जें देणें आणि उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणें ह्यांचे दिशेनें त्या देशांत थोडेंबहुत सहकारी संघटन झालें असलें तरी उत्पादन जोंपर्यंत व्यक्तिगत आहे तोंपर्यंत संपत्तीची वाटणी समाधानकारक होऊं शकत नाहीं. त्याकरितां आधुनिक शास्त्रांच्या सहायानें लहान प्रमाणावर धंदे व शेती चालवतां येणें आवश्यक झालें आहे. म्हणून सहकारी पद्धतीनें त्या दिशेनें आर्थिक पुनर्रचना हिंदुस्थानांत केली जाणें अगत्याचें आहे असें श्री. मसानी ह्यांनीं प्रतिपादिलें.

---

### होळकर संस्थानांतील सहकारी प्रगति

इंदूरच्या सहकारी खात्याचा १९४१-४२ चा सप्टेंबर १९४२ अखेरचा ताजा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या वर्षांत सहकारी खात्याचा एकूण खर्च २३,१७६ रुपये झाला. "खात्याकरितां खर्चाची तरतूद अत्यंत अपुरी आहे व सरकारनें पुष्कळच अधिक तरतूद केली पाहिजे." असें अहवालांत म्हटलें आहे. संस्थानांत ५ मध्यवर्ती बँका, ७८५ शेतकी व ८८ बिगर शेतकी सोसायट्या आहेत. सोसायट्यांच्या सभासदांची संख्या ३१,७३१ आहे. प्रत्येक सोसायटींत सरासरीनें ३६ सभासद आहेत. सर्व सहकारी चळवळीचें खेळतें भांडवल ९५ लक्ष रुपये आहे. प्रत्येक सोसायटीच्या खेळत्या भांडवलाची सरासरी १०,८०८ रुपये आहे. सोसायट्यांच्या स्वतःच्या भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण २३% पडतें. संस्थानांतील सुमारें १ लक्ष ६० हजार म्हणजे १०% लोकसंख्येचा (एका कुटुंबांत ५ लोक असतात ह्या हिशेबानें) सहकारी चळवळीशीं संबंध आलेला आहे. संस्थानांतील ३,७०० खेड्यांपैकीं ८९५ खेड्यांत सोसायट्या आहेत. सोसायट्या सेंट्रल बँकांकडून ९% व्याजानें कर्जें घेतात व आपल्या सभासदांस १२% व्याजानें तीं देतात. कांहीं प्रसंगीं सभासदांकडून १५% व्याजहि घेण्याची पाळी येते. सहकारी खात्याच्या आपल्या अहवालांत रजिस्ट्रार, रावरत्न ए. जी. शेळेकर, ह्यांनीं आपल्या अडचणी खुलासेवार मांडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या उन्नतीच्या प्रयत्नांत सहकारी संस्थांचें महत्त्व सरकारास नीट पटल्याखेरीज सहकारी खात्याचें काम कार्यक्षम होणार नाहीं. इंदूर संस्थानांत सहकारी चळवळीस केवढा वाव आहे व ह्याबाबत रजिस्ट्रार साहेबांचे प्रयत्न व अडचणी काय आहेत, ह्याची कल्पना अहवालावरून चांगली येते. त्यांच्या सूचना विचारार्ह आहेत.

---

### बँक ऑफ. कार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा मार्च, १९४४ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. चीनमधील सहकारी औद्योगिक संस्थांचें वर्णन करणारा सर जे. बी. टेलर ह्यांचा लेख त्रैमासिकांत आला आहे. "खेडेगांवी लोकांची स्थिति सुधारण्याची आवश्यकता चीन इतकीच हिंदुस्थानांतहि तीव्र आहे. कांहीं लोकांना शहरांत कामगार म्हणून नेण्यानें प्रश्न सुटणार नाहीं. शहरांतील औद्योगिक प्रगति, खेडेगांवांतील उद्योगधंदे मारून टाकून तेथील स्थिति बिघडवते, असा अनुभव आहे. चीनमधील सहकारी औद्योगिक मंडळ्यांच्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांतहि संस्था निर्माण झाल्या पाहिजेत." असा त्यांनीं लेखाचा शेवट केला आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास प्रभृतींच्या आर्थिक योजनेचें परीक्षण श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. सिलोनमधील सहकारी चळवळीच्या प्रगतीची माहिती श्री. एल. के. [illegible] ह्यांनीं दिली आहे. श्री. एन. व्ही. नायक ह्यांच्या लेखांत पूर्व खानदेशांतील सहकारी कापूस विक्री सोसायट्यांच्या कारभाराची विस्तृत माहिती आली आहे. मुंबई शहरांत सहकारी चळवळीच्या प्रसारास कसा वाव आहे, हें श्री. एस. जी. कोटिभास्कर ह्यांनीं सांगितलें आहे.

### मिरजोळें शेतकी सहकारी पतपेढी
(डि. मा. प्र.)

रत्नागिरी डे. को. इन्स्टिट्यूटच्या प्रयत्नानें १९२७ सालीं वरील सोसायटीची स्थापना झाली. १८ मार्च १९२८ रोजीं तिच्या कार्यास प्रारंभ झाला. सध्या तिचे पटावर ५७ सभासद आहेत. सोसायटीच्या रिझर्व्ह फंडाचें ९९१ रुपये, व भाग भांडवलाचे ८५३ रुपये, या स्वतःच्या भांडवलावरच तिचा व्यवहार मुख्यतः चालतो. सभासदांकडील येणें कर्ज सुमारें १,७८० रुपये आहे. नेहमीच्या व्यवहारापेक्षा ज्यास्त असा आंबे विक्रीच्या व्यवहारांचा उपक्रम सोसायटीनें १९२९ सालीं केला व त्याच्या यशाबद्दल तिला रत्नागिरी येथील आंब्यांच्या प्रदर्शनांत सुवर्ण-पदक मिळालें. सोसायटीनें वेळोवेळ देणग्या देऊन, फेब्रुवारी १९४३ मध्यें आठ सभासदांचीं घरें आग लागून जळालीं त्या वेळीं स्वतः सहाय करून व सरकारकडून १२० रुपयांची मदत मिळवून देऊन, पाचोळयाच्या खताचे खड्डे व लायब्ररी यांचा प्रारंभ करून व शेतकऱ्यांत वाटण्यासाठीं २५ टन भुईमुगाच्या पेंडीच्या खतांची खरेदी करून आपल्या सभासदांची व इतर शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक उन्नति घडवून आणण्याची खटपट सोसायटी करीत आहे. सोसायटीनें योग्य किंमतीस धान्य विक्री करणारें एक दुकानहि नुकतेंच उघडलें आहे.

---

### मोडी लिपीचा लघुलिपीप्रमाणें उपयोग होण्याची शक्यता

मराठी भाषेंतील द्रुतलिपी म्हणून पूर्वी मोडी लिपीचा फार प्रसार होता. मोडी लिपीला सर्व ठिकाणीं स्थान होतें; परंतु अलीकडे मोडी लिपी हळू हळू मागसत चालली असून ती आतां अधिकाधिक दुर्बोध होत चालली आहे. सर्वसाधारपणें मनुष्य ज्या वेगानें बोलतो, त्या वेगांत मोडी लिपी लिहितां येते. आपली लिपी शब्दांच्या उच्चारावरच सामान्यतः बसवली असल्यानें कोणत्याहि भाषेंतील उच्चार आपल्या लिपींत लिहितांना फारशी अडचण पडत नाहीं.

या मोडी लिपींतच थोड्याशा सुधारणा केल्या असतां तिचा लघु लिपीप्रमाणें उपयोग होण्याची शक्यता आहे. लघु लेखन कला जाणणाऱ्यांनीं या बाबतींत थोडेसें लक्ष घातल्यास मराठी व इंग्रजी या भाषांकरतां लघु लिपीचें एक उत्कृष्ट माध्यम निर्माण होण्याचा संभव आहे व शिवाय मोडी लिपीची एक लुप्त होत चाललेली कलाही पुन्हां उदयास आणतां येईल हें निराळेंच.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

---

### स्वदेशी मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४३ मध्यें ३ कोटि, १४ लक्ष रुपयांची विक्री केली; १९४० मधील विक्री ५२ लाखांची होती. नफा ३ लाखांवरून १ कोटि, १४ लाखांवर गेला. १९४० सालीं करासाठीं ५ हजार रुपये लागले. १९४३ चा कराचा आंकडा ८४ लक्ष रुपये आहे. डिव्हिडंडचा दर १९४० सालीं ७% होता. १९४३ अखेर तो २५% आहे. कंपनीचें वसूल भांडवल ४५ लक्ष रुपये आहे.


## बॉम्बे को-ऑपरेटिव
## इन्शुअरन्स सोसायटी लि.

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

| | | |
|---|---|---|
| एकंदर कामकाज | ... | १। कोटीहून अधिक |
| एकूण मालमत्ता | ... | १८ लाखांहून अधिक |
| आयुर्विमा फंड | ... | १६ लाखांहून अधिक |

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानच्या आघाडीवरील
सहकारी विमा संस्था

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

## धान्य वाटपासाठी सहकारी संघटनेचा उपयोग

### प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचे चेअरमन, सर जे. ए. मदन ह्यांचें समासदांस पत्रक

धान्य गोळा करण्याची एक व्यापक योजना मुंबई सरकारनें नुकतीच स्वीकृत केली आहे, त्यांतील मुख्य बाब, जमीन धारण करणारावर ठराविक प्रमाणांत सरकारला धान्य विकण्याची केलेली सक्ती, ही होय. धान्याच्या व्यापाराचा एकमेवाद्वितीय अधिकार सरकारनें स्वतःकडे राखून घेतला आहे. ह्या दोन्हीं गोष्टींमुळें, खेडेगांवें, लहान गांवें व व्यापारी केंद्रें येथें धान्य वाटपाची पद्धतशीर व्यवस्था आंखणें अगत्याचें झालें आहे. ही व्यवस्था करण्यासाठीं शक्यतोंवर वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या संघटनेचा उपयोग करून घेण्याचा सरकारचा विचार दिसतो, असें गेल्या कांहीं आठवड्यांत सरकारतर्फे काढण्यांत आलेल्या कांहीं उद्गारांवरून अनुमान निघतें. जे स्वतः धान्य पेरीत नाहींत व ज्यांना धान्यासाठीं स्थानिक साप्ताहिक बाजारांवरच अवलंबून रहावें लागतें, अशा खेडेगांवीं जनतेच्या गरजा भागविण्याचा, प्रस्तुत सरकारी धोरणाचा मुख्य हेतु आहे. अशा लोकांना धान्यपुरवठा वक्तशीर व शक्य तितका स्वस्त केला जाणें आवश्यक आहे.

धान्य वाटण्याचें काम प्राधान्येंकरून सहकारी संस्थांकडे सोपविण्याची सरकारची इच्छा आहे व त्यासाठी असिस्टंट रजिस्ट्रारांनीं आपल्या क्षेत्रांतील कार्याची आखणी करावी, अशा अर्थाचें पत्रक सहकारी सोसायटयांच्या रजिस्ट्रारनीं असिस्टंट रजिस्ट्रारांकडे पाठविलें आहे. धान्य वाटपासाठीं प्रत्येक तालुक्यांत दहा ते बारा केंद्रें असावींत. ह्यांपैकीं कोणत्या केंद्रांची व्यवस्था (१) मल्टिपर्पज सोसायटी, (२) व्यापक व्यवहाराची पतपेढी, (३) कंझूमर्स स्टोर्स अथवा (४) मध्यवर्ती बँकेनें, सेंट्रल स्टोर्सनें किंवा पर्चेस अँड सेल युनियननें उघडलेलें योग्य किंमतीच्या धान्याचें दुकान, ह्यांपैकीं कोणाकडे सोंपवावी हें ठरवावें लागेल. तेव्हां, सहकारी कार्यकर्त्यांनीं आपल्या क्षेत्रांतील असिस्टंट रजिस्ट्रारला सत्वर भेटून, त्यांतील कार्याची योजना वरील प्रमाणें आंखण्यास त्यास सहाय्य करावें. वेगवेगळ्या तालुक्यांत धान्याची वांटणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशीं तपशिलवार चर्चा करण्यांत असिस्टंट रजिस्ट्रारबरोबर सहकारी होण्याची आवश्यकता पुढें कदाचित वाटेल.

जेथें सहकारी संस्थामार्फत धान्यवाटणी सुरू होईल तेथें मालवहाचा पुरवठा, धान्याचा सांठा व कामाची देखरेख ह्यासंबंधींचा तपशीलहि ठरवावा लागेल व ह्याबावतींतहि सहकारी कार्यकर्त्यांच्या सूचना व मार्गदर्शन हीं उपयुक्त होतील.

सहकारी चळवळीच्या कार्यापैकीं आजच्या मितीस अत्यंत जबाबदारीचें असें हें कार्यक्षेत्र आहे, हें येथें नमूद करणें आवश्यक आहे. सध्यासारख्या अभूतपूर्व अडचणींचे प्रसंगीं, सहकारी सोसायटयांचे सभासद व असंघटित खेडेगावी जनता ह्यांची सेवा करण्याची ही संधी आहे व तिचा चांगला उपयोग केल्यास सहकारी चळवळीस श्रेय मिळेल व तिचा दर्जा वाढेल. खेडेगांवांतून वाटपाची सहकारी संघटना करण्याची मुहूर्तमेढ रोंवण्यास सहकारी कार्यकर्त्यांना ही चांगली संधी आहे. ह्या संघटनेंतून सहकारी चळवळीचें एक नवें महत्त्वाचें अंग कालांतरानें निर्माण होणें अगदीं शक्य आहे. ह्या सर्व दृष्टींनीं विचार करून, सहकारी कार्यकर्त्यांनीं वरील प्रश्नाचा विचार करावा व ह्यासंबंधांतील आपल्या तालुक्यांतील अथवा जिल्ह्यांतील कार्याच्या प्रगतीची माहिती इन्स्टिटयूटकडे वक्तशीर पाठवावी.


पुना गेस्ट हाउस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona-2.

स्वतःची खात्री करा व पैशांचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे कांटे, वजनें व मापें, वगैरे रिपेअर करून मिळतील.

## हातमाग आजवर टिकले; पुढेंहि टिकवले व वाढवले पाहिजेत

### आवडी–निवडींत बदल

लोकांच्या कपड्यासंबंधीं आवडी–निवडींत होणाऱ्या फरकांमुळें हातमागांच्या कापडाची जागा गिरण्यांचें कापड घेऊं लागलें आहे. सगळीकडेच पगड्या व फेटे ह्यांचा वापर कमी झाला आहे; सदरे व कुडतीं बाद्‍झालीं आहेत; चादरी व अंगवस्त्रें ह्यांस मागणी पूर्ववत् राहिलेली नाहीं. स्त्रिया चोळकी अधिकाधिक वापरूं लागल्या आहेत. उत्तर हिंदुस्थानांत घागरा, लेंगा, सलवार, कुडता, इत्यादींची जागा साड्या घेऊं लागल्या आहेत. पुरुष गंजिफाक वगैरे वापरूं लागले आहेत. एकट्या संयुक्त प्रांतापुरतेंच पाहिलें, तर तेथील शहरी स्त्रियांतील लेंगा वापरणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण गेल्या वीस वर्षांत ९५% वरून ५% वर आलें आहे व खेडेगांवांतून तें १००% वरून ४०% वर आलें आहे. ह्याच्या उलट, साडी नेसणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण शहरांतून ५% वरून ९५% वर गेलें आहे व खेडेगांवांत साड्यांचा प्रसार अजिबात नव्हता तेथें आतां ४०% स्त्रिया त्यांचा अवलंब करीत आहेत. त्याच मुदतींत डोक्यावर फेट्यापेक्षां टोपी घालणाऱ्या शहरी पुरुषांची संख्या ५०% ची ८५% झाली आहे व खेडेगांवांत पूर्वीच्या ५% ऐवजी २५% लोक टोप्या वापरूं लागले आहेत.

सध्या हातमागांवर जें कापड निघतें, त्यांत स्त्रियांच्या साड्या व लुगडीं, लेंग्याचें व सलवारीचें कापड व चोळखण ह्यांचा मुख्यतः समावेश होतो. पुरुषांच्या कापडापैकीं धोतरें, लुंग्या, चादरी, अंगवस्त्रें, पगड्या, फेटे, सद्र्याचें कापड, इत्यादींचें कापड, त्याचप्रमाणें टॉवेल, मच्छरदाण्यांचें कापड, लॉंगक्लॉथ, इत्यादींचें कापड हातमागांवर निघूं शकतें. मुंबई, मद्रास, बंगाल व मध्यप्रांत ह्यांतील हातमागांवर मुख्यतः साड्याच काढण्यांत येतात. संयुक्तप्रांत व पंजाब येथें भरड खादी निघते. मुंबई प्रांतांतील हातमागाच्या उत्पादनापैकीं ९१% उत्पादन साड्यांचेंच आहे; मद्रास प्रांतांत हें प्रमाण ४४%, मध्यप्रांतांत ७५%, व बंगालमध्यें ४०% आहे. संयुक्त प्रांतांतील उत्पादनाच्या ६०% उत्पादन व पंजाबमधील ४३% उत्पादन खादीचें आहे.

### त्याचा हातमागावर परिणाम

गिरण्यांच्या कापडाची हातमागाच्या कापडाशीं स्पर्धा गेलीं कित्येक वर्षें चालू आहे. १९०१–०२ ते १९३६–३७ ह्या मुदतींत हिंदी गिरण्यांचें उत्पादन ७०६% वाढलें. हातमागांच्या उत्पादनांत फक्त ५३% ची वाढ झाली. तथापि, गिरणीचें कापड हातमागाच्या कापडाचा पराभव करूं शकलें नाहीं; आयात होणाऱ्या कापडावरच हिंदी वाढत्या उत्पादनाचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे. बंगालमध्यें पांढऱ्या कापडाचा वापर जास्त आहे. तेथें गिरण्या व हातमाग ह्यांचेमध्यें विशेष स्पर्धा आढळते. ज्या प्रांतांत रंगीत कापड लोकप्रिय आहे तेथें हातमागाच्या कापडाचें उच्चाटण होऊं शकलें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी स्त्रिया गिरण्यांतील साड्या वापरीत नव्हत्या, पांढऱ्या साड्या तर अशुभ समजल्या जात. धोब्याच्या धुलाईचें व इस्त्रीचे कपडे वापरण्याचा प्रघात वाढल्यापासून शहरांतून गिरण्यांत तयार झालेल्या स्वस्त, पांढऱ्या व मंद रंगाच्या साड्या लोकप्रिय झाल्या. कामगार स्त्रिया मात्र हातमागावरील साड्या महाग पडल्या तरी त्याच घेतात, मध्य व उच्च वर्गाच्या स्त्रियांना फार काळ न टिकणाऱ्या, स्वस्त व नव्या नव्या डिझाइनच्या साड्याच पसंत पडतात. ह्या साड्यांची संख्याहि जास्त लागते व साहजिकच गिरण्यांच्या उत्पादनांत त्यामुळें भर पडते.

### हातमागांची आजची स्थिति

सबंध हिंदुस्थानांतील एकूण सुमारें २० लक्ष हातमागांपैकीं १७ लक्ष हातमाग चालू आहेत. त्यांपैकीं सुमारें १४ लक्ष मागांवर कपास कापड निघतें व २½ लक्ष मागांवर रेशमी कापड निघतें. कोष्ट्यांची संख्या सुमारें २४ लक्ष भरेल. त्यांपैकीं १४½ लक्ष लोकांच्या उदरनिर्वाहाचें हातमाग हें एकमेव साधन आहे. ह्या २४ लक्ष कोष्ट्यांपैकीं प्रत्येकावर सरासरीनें तिघांचें पोषण अवलंबून आहे, असें मानल्यास एक कोटि लोकांचे हितसंबंध ह्या धंद्यांत प्रत्यक्ष गुंतलेले आहेत, असा अर्थ होतो. यंत्रावर चालणाऱ्या मागांची संख्या १९४१ मध्यें सुमारें १२ हजार होती, त्यांपैकीं निम्म्यापेक्षां ज्यास्त मुंबई प्रांतांतच होते. म्हैसूर व कोल्हापूर ह्यांचा नंतर अनुक्रम लागतो. हातमाग म्हणजे खेड्यांतच असणार, अशी सामान्य समजूत आहे. तथापि बहुसंख्य कोष्टी आतां शहरांतच आहेत, असें आढळून येतें. कच्च्या मालाची–सुताची–खरेदी व तयार मालाची विक्री ह्या दोन्ही बाबतींत विणकऱ्यास नुकसानकारक दरांनीं व्यवहार करावा लागतो व मध्यस्थांच्या दलालीचा बोजा त्याचेवर पडतो. २०° वरील नंबराच्या धाग्याचें कापड, सोनेरी व रुपेरी धागे मिसळलेलें कापड, रंगबेरंगी डिझाइन्सचें कापड, नक्षीदार व विशेष सुमारीचें कापड, नवारीसारखें अगदीं कनिष्ठ कापड, ह्यांचे बाबतींत हातमागांस विशेष सवड असते. तथापि, विणीमध्यें सारखेपणाचा अभाव, लांबीरुंदीमध्यें तफावत, फिनिशचा अभाव, इत्यादि त्यांत दोषहि येतात.

### हातमागांचें राष्ट्रीय महत्त्व

शेतीच्या खालोखाल कोष्ट्यांचाच धंदा महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानांतील कापडाच्या उत्पादनापैकीं ६८% उत्पादन गिरण्यांत होतें, तरी त्यांतील कामगारांची संख्या ५ लक्षच आहे. ह्या उलट २५% ते ३०% कापड उत्पादन करणाऱ्या हातमागांवर, कापडाच्या धंद्यांतील कामगारांच्या ८५% कामगार आपलें पोट भरीत आहेत. ह्यावरून हातमागांच्या धंद्याचें राष्ट्रीय महत्त्व व तो धंदा बंद पडला तर येणारी आपत्ती ह्यांची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील बेकारीस आळा घालण्यास मोठाले कारखाने व गिरण्या ह्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. साखर, कापड, लोखंड, पोलाद, सिमेंट, ताग, इत्यादींच्या कारखान्यांत १५ लक्ष कामगारांसच जेमतेम उद्योग मिळालेला आहे. भांडवल कमी लागावें व पुष्कळ लोकांना काम मिळावें, ही दृष्टि हिंदी आर्थिक रचनेंत ध्यानांत बाळगली पाहिजे. हातानें सूत कातणें व विणणें ह्यावर महात्मा गांधींचा भर ह्या कारणासाठींच आहे.

### "अधिक धान्य पिकवा" मोहिमेंतील बिनसरकारी सहाय्यकांना बक्षिसें

मुंबई प्रांतांतील "अधिक धान्य पिकवा" मोहीम यशस्वी झाली, त्यांत बिनसरकारी लोकांचा—शाळा मास्तर, विद्यार्थी व इतर यांचा वाटा आहे. हें लक्षांत घेऊन, चालू मोसमांत ह्या मोहिमेस हातभार लावणाऱ्या लायक बिनसरकारी लोकांना बक्षिसें देण्यासाठीं मुंबई सरकारनें तीनहि कमिशनरच्या भागांना प्रत्येकी १,००० रुपये दिले आहेत.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२०/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.